नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/१०/२०२४ (गुरूवार) सायंकाळ

---

## पोलीस स्टेशन कुही तसेच कळमेश्वर अंतर्गत आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुशंगाने रूटमार्च

आज दिनांक २४/१०/२०२४ चे १७/०० ते १९/३० वा. पर्यंत पोलीस स्टेशन कुही अंतर्गत माण सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्रीमती वृष्टी जैन व पोनी भानुदास पिदुरकर ठाणेदार कुही यांचा मार्गदर्शन विधानसभा सार्वत्रिक निवडणूक निमीत्याने कायदा व सुव्यवस्था राखने कामी तसेच कोणाची भीती न बाळगता निवडणूक निर्भिडपणे पार पाडणे संबंधात, रुट मार्च घेण्यात आला सदर रुट मार्च हा कुही शहर व मांढळ शहर याठिकाणी घेण्यात आला. रूट मार्च दरम्यान कुही परीसरातील गुन्हेगारांची ओळख परेड घेण्यात आली तसेच नागरीकांशी सुसंवाद साधण्यात आला. सदर रुट मार्च मध्ये पोलिस स्टेशन कुही येथील ०३ अधिकारी १२ अंमलदार, शसस्त्र सीमा दलचे ०१ अधीकारी व १५ पोलिस अंमलदार असे एकुण ०५ अधीकारी व २७ पोलिस अंमलदार हजर होते.

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आज दिनांक २४/१०/२०२४ रोजी वेळ १६/३० वाजता पासून ते १७/३० वाजता पर्यंत आगामी विधानसभा निवडणूक सण २०२४ निमित्त पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत माननीय श्री अनिल मस्के सा. माण सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात रूट मार्च चे आयोजन करण्यात आले होते सदर रूट मार्च हे पोलीस स्टेशन कळमेश्वर येथून सुरू करून तळ्याची पार ते बस स्टॅन्ड चौक ते मारुती जोड चौक ते बाजार चौक ते जुना मटन मार्केट ते अंडा चौक ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक वरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे समाप्त करण्यात आले. पोलीस अधिकारी यांनी नागरीकांसोबत संवाद साधुन त्यांना निवडणुक संबंधाने मार्गदर्शन करण्यात आले तसेच भयमुक्त आणि शांततेत निवडणुक पार पाडण्याबाबत चर्चा करण्यात आली. सदर रूट मार्चमध्ये एकूण ०५ पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे पोलिस अंमलदार तसेच सैनिक होमगार्ड तसेच एसएसबी दलाचे जवान असे एकूण ४३ कर्मचारी उपस्थित होते.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर